# मंत्रिमंडळ निर्णय

## ६ ऑक्टोबर २०१५

## ( मंत्रिमंडळ बैठक क्र. ५० )

| अ.क्र. | विषय | विभाग |
| --- | --- | --- |
| १ | एकूण साडेबारा हजार कोटींचा खर्च अपेक्षित<br>मुंबई मेट्रो मार्ग सात आणि दोनच्या<br>अंमलबजावणीस मंत्रिमंडळाची मान्यता | नगरविकास |
| २ | १ नोव्हेंबर पासून प्रकल्प सुरू करणार<br>दाभोळ प्रकल्पाच्या पुनरूज्जीवनासाठी<br>राज्य शासनाचे महत्त्वाचे निर्णय | ऊर्जा |
| ३ | आगामी ऊस गाळप हंगामासाठी<br>अल्प मुदत कर्जासह थकहमी देणार | सहकार |

### इतर

### पाऊस/पीक-पाणी

१. राज्यात सरासरीच्या ६२ टक्के पाऊस, ५६ टक्के पाणीसाठा

### बातमी

१. राज्य मंत्रिमंडळातर्फे मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन

-----

एकूण साडेबारा हजार कोटींचा खर्च अपेक्षित

**मुंबई मेट्रो मार्ग सात आणि दोनच्या**

**अंमलबजावणीस मंत्रिमंडळाची मान्यता**

मुंबई मेट्रो बृहत् आराखड्यातील मेट्रो मार्गाच्या अंमलबजावणीसाठी मेट्रो मार्ग २ मधील दहिसर-चारकोप-वांद्रे-मानखुर्द या मार्गाच्या पहिल्या टप्प्यातील दहिसर(पूर्व)-डी.एन.नगर यासह मुंबई मेट्रो मार्ग-७ मधील अंधेरी (पूर्व)-दहिसर (पूर्व) या उन्नत मेट्रो मार्ग प्रकल्पाच्या अंमलबजावणीस मान्यता देण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या दोन प्रकल्पांसाठी एकूण १२ हजार ६१८ कोटी रूपयांच्या खर्चासही मान्यता देण्यात आली. हे दोन्ही मार्ग मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे (एमएमआरडीए) बांधण्यात येणार असून ते मार्च २०१९ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहेत.

मुंबई महानगर प्रदेश वाहतूक आणि परिवहन व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्यासाठी मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पाचा १७२ किलोमीटरचा बृहत् आराखडा तयार करण्यात आला आहे. मात्र, या संपूर्ण आराखड्याच्या अंमलबजावणीस दीर्घ कालावधी लागू शकतो. त्यामुळे त्यातील प्राधान्यक्रम ठरवून ७ प्रकल्पांची तातडीने अंमलबजावणी करण्याचे धोरण आखण्यात आले आहे. या सात प्रकल्पांतून एकूण ११८ किमी लांबीच्या मेट्रो मार्गाची उभारणी करण्यात येणार आहे.

या नियोजनाच्या बृहत् आराखड्यानुसार दहिसर-चारकोप-वांद्रे-मानखुर्द मेट्रो मार्गाच्या पहिल्या टप्प्यातील दहिसर (पूर्व) ते डीएन नगर या १८.६० किलोमीटर मार्गाच्या उभारणीस मान्यता देण्यात आली. या प्रकल्पासाठी सहा हजार ४१० कोटी रूपये खर्च येणार आहे. राज्य शासनातर्फे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे एक हजार ८९२ कोटी, राज्य शासनाकडून कर्जापोटी ७५७.५० कोटी, केंद्र शासनाकडून कर्जापोटी २९२.५० कोटी, या प्रकल्पास नाममात्र दराने शासकीय जमीन उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाचे सहाय्य म्हणून ६६५ कोटी तसेच एमएमआरडीएकडून कर्जस्वरूपात दोन हजार ८०३ कोटी रूपये उभारण्यात येणार आहेत. या मार्गावर १७ स्थानके असतील.

मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीत आणखी एका मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या उभारणीस मान्यता देण्यात आली. मुंबई मेट्रो मार्ग-७ मधील अंधेरी (पूर्व) ते दहिसर (पूर्व) या १६.५ किलोमीटर लांबीच्या मार्गाच्या उभारणीसही हिरवा कंदिल दाखविण्यात आला. हा मार्ग पूर्णत: उन्नत स्वरुपातील असून त्यासाठी सुमारे सहा हजार २०८ कोटी रूपये खर्च अपेक्षित आहे. हे भांडवल उभे करण्यासाठी राज्य शासनातर्फे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे दोन हजार ३२० कोटी, राज्य शासनाचे कर्जापोटी ७३३.५० कोटी, केंद्र शासनाचे कर्जापोटी ३०२.५० कोटी, प्रकल्पास नाममात्र दराने शासकीय जमीन उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाचे सहाय्य म्हणून ६०६ कोटी तसेच एमएमआरडीएकडून कर्जस्वरूपात दोन हजार २४६ कोटी रूपये उभारण्यात येणार आहेत. या मार्गावर १६ स्थानके असतील.

या दोन्ही प्रकल्पांतील मार्गांवर पहिल्या तीन किमीसाठी १० रूपये, त्यानंतरच्या ३ ते १२ किमी या टप्प्यासाठी २० रूपये तर १२ किमी अंतराच्या पुढील टप्प्यासाठी ३० रूपये भाडे आकारण्यात येणार आहे. या प्रकल्पांसाठी विविध स्त्रोतांपासून उभारण्यात आलेला निधी -समर्पित नागरी परिवहन निधी॰ म्हणून ठेवण्याचे संकल्पित आहे. या निधीचा विनियोग या मेट्रो प्रकल्पासाठी राज्य शासनाच्या वतीने लागणाऱ्या समभागाची रक्कम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे वर्ग करण्यासाठी तसेच कर्जाच्या परतफेडीसाठी निधी अपुरा पडत असल्यास स्वतंत्र पूरक निधी उभारणीसाठी करण्यात येणार आहे. या प्रकल्पाकरिता विविध वित्तीय संस्थांकडून कर्ज घेऊन त्याचे व्याज आणि परतफेडीची जबाबदारी एमएमआरडीवर सोपविण्यात आली आहे. या प्रकल्पांकरिता आवश्यक असणारी जमीन एमएमआरडीएला नाममात्र भाडेतत्वावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

मुंबईच्या परिवहन सेवेसाठी आवश्यक असणारे हे प्रकल्प -निकडीचा सार्वजनिक प्रकल्प॰ आणि -महत्त्वपूर्ण नागरी परिवहन प्रकल्प॰ म्हणून घोषित करण्यात आला आहे. या प्रकल्पांसाठी लागणारा प्रशासकीय आणि व्यवस्थापकीय खर्च दोन टक्क्यापेक्षा अधिक होणार नाही, याची दक्षता घेण्यात येणार आहे. तसेच या प्रकल्पांसाठी महाराष्ट्र विद्युत नियामक मंडळाकडून -ना नफा ना तोटा॰ तत्त्वावर वीज उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन शिफारस करणार आहे. या प्रकल्पाच्या प्रभाव क्षेत्राकरिता एमएमआरडीएला विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

मेट्रो मार्गावरील बेस्टच्या मालकी हक्काचे बस डेपो आणि स्थानके यांचे मेट्रो सेवेशी एकात्मिकरण आणि बस डेपोंचा व्यापारी तत्त्वावरील विकास करणे शक्य आहे, अशा बेस्ट प्रशासनाने यापूर्वीच मान्यता दिलेल्या जमिनीद्वारे निधी उभारणे आणि त्याची विभागणी करण्याबाबतची यंत्रणा तयार करण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली.

-----o-----

<u>१ नोव्हेंबर पासून प्रकल्प सुरू करणार</u>

**दाभोळ प्रकल्पाच्या पुनरूज्जीवनासाठी**
**राज्य शासनाचे महत्त्वाचे निर्णय**

दाभोळ येथील रत्नागिरी गॅस अँड पॉवर प्रायव्हेट लिमिटेड (आरजीपीपीएल) वीज निर्मिती प्रकल्प पुनर्जिवित करण्यासाठी केंद्राच्या मार्गदर्शक तत्त्वांना अनुसरून राज्य शासनाने घेतलेल्या निर्णयांसह केंद्र शासनानेच तयार केलेल्या पॉवर सिस्टीम डेव्हलपमेंट फंड (पीएसडीएफ) अंतर्गत विशिष्ट सवलती देण्यास राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली. या निर्णयामुळे १ नोव्हेंबर २०१५ पासून हा प्रकल्प सुरू करण्याच्या निर्णयास मदत होणार आहे.

दाभोळ येथील हा प्रकल्प नैसर्गिक वायूच्या पुरवठ्याअभावी नोव्हेंबर २०१३ पासून बंद आहे. त्यामुळे ७८०० कोटी रूपयांच्या थकीत कर्जामुळे हा प्रकल्प अनुत्पादक मालमत्ता म्हणून घोषित होण्याच्या मार्गावर आहे. या कंपनीमध्ये महाराष्ट्र राज्य वीज मंडळ (होल्डिंग कंपनी) च्या १३.५० टक्के भागभांडवलाचा समावेश आहे.

देशातील सुमारे १४ हजार ३०५ मेगावॅट क्षमतेचे वायुवर आधारित वीज निर्मिती प्रकल्प सध्या बंद आहेत. आयात केलेल्या द्रवरूप नैसर्गिक वायूची किंमत अधिक असल्याने कमी खर्चातील वीजनिर्मिती शक्य नाही. त्यामुळे द्रवरूप नैसर्गिक वायुचा इंधन म्हणून वापर करून कमी खर्चात वीजनिर्मिती करू शकेल असे प्रकल्प सुरू करण्याची योजना केंद्र शासनाने आखली आहे. दोन वर्षांच्या कालावधीसाठी केंद्र शासनाकडून सवलती देण्याव्यतिरिक्त प्रकल्पातील भागधारकांना सवलती देण्यात येणार आहेत. त्यानुसार मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीत केंद्राकडून सीमा शुल्क, सीएसटी यांची माफी, तसेच ७ हजार ५०० कोटींची सवलत तसेच राज्य शासनाकडून व्हॅट, सीएसटी आणि प्रवेश कर, ऑक्ट्रॉयमधून सूट देण्यात येणार आहे. या प्रकल्पाला पुरविल्या जाणाऱ्या द्रवरूप नैसर्गिक वायुवरील पाईपलाईन दर आणि रिगॅसीफिकेशनच्या दरामध्ये गेल कंपनीकडून ५० टक्के माफी देण्यात येणार आहे. केंद्रीय पारेषण उपक्रमांकडून आंतरराज्य वीज वाहिनीवरील ट्रान्समिशन चार्जेस आणि लॉस याला पूर्णपणे माफी देण्यात येणार आहे. याच धर्तीवर राज्य पारेषण उपक्रमांनाही माफी द्यावयाची आहे.

या प्रकल्पांतील ५०० मेगावॅट विजेपैकी रेल्वेकडून महाराष्ट्र राज्यात २५०, गुजरातमध्ये ५०, झारखंडमध्ये १०० आणि पश्चिम बंगालमध्ये १०० मेगावॅट वीज वापरली जाणार आहे. पॉवर सिस्टीम डेव्हलपमेंट फंड अंतर्गत मिळणारी सवलत आणि अन्य सवलती विचारात घेऊन रेल्वेस ४.७० रूपये प्रती युनिट दराने वीजपुरवठा अपेक्षित आहे. त्यानंतरही रेल्वे पाच रूपये दराने वीज खरेदी करणार आहे.

हा प्रकल्प सुरू होण्यासाठी या प्रकल्पाचे विभाजन करून विद्युत निर्मिती केंद्र आणि टर्मिनल अशा दोन कंपन्या करण्याबाबत ठरविलेल्या मार्गदर्शक तत्त्वांना मंजूरी देण्यात आली. टर्मिनलच्या क्षमतेत वाढ करण्यासाठी २ हजार ४४ कोटी रूपयांची अधिकची गुंतवणूक करण्यात येणार आहे. राज्य

शासन या प्रकल्पासाठी पीएसडीएफ योजनेंतर्गत पुढील दोन वर्षांसाठी १५० कोटी कर (प्रतिकात्मक) माफी तसेच पारेषण खर्च माफीसाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास निदेश देणार आहे. प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या विजेच्या पारेषणामुळे दरवर्षी १७६ कोटी रूपये खर्च अपेक्षित आहे. प्रकल्प सुरू करण्याकरिता सर्व संबंधिताकडून सहाय्य अपेक्षित असून राज्य शासनानेही याबाबत आपली जबाबदारी पार पाडण्याची भूमिका घेतली आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे हा प्रकल्प चालू राहिल्यास सन २०३४ पर्यंत सर्व कर्जाची परतफेड अपेक्षित आहे.

राज्य वीज मंडळ होल्डिंग कंपनीकडून पुन्हा नव्याने समभागाच्या स्वरुपात आणखी गुंतवणूक या प्रकल्पामध्ये करण्यात येऊ नये, परंतु इतर समभागधारक त्यांचे समभाग विक्रीस काढतील, त्यावर होल्डिंग कंपनीचा पहिला हक्क अबाधित राहणार आहे. तसेच महावितरण आणि दाभोळ प्रकल्प यातील दाव्याबाबतही सर्वसामान्य तोडगा करण्यासाठी केंद्र शासनाकडे विनंती करण्यात येणार आहे. रेल्वेने केंद्रीय वीज नियामक आयोगाकडे मुक्त प्रवेशासाठी केलेल्या निवेदनाचे समर्थन महापारेषण कंपनीने करून प्रचलित नियमनाप्रमाणे रेल्वेस या प्रकल्पातून मिळणारी वीज महापारेषणच्या ग्रीडमधून वाहून नेण्यात येणार आहे.

-----०-----

## आगामी ऊस गाळप हंगामासाठी
## अल्प मुदत कर्जासह थकहमी देणार

राज्यातील उसाच्या आगामी गाळप हंगामासाठी (सन २०१५-१६) सहकारी साखर कारखान्यांना अल्प मुदतीचे कर्ज आणि थकहमी देण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. याचा लाभ राज्यातील किमान २२ सहकारी साखर कारखान्यांना होणार आहे.

यासाठी साखर आयुक्त यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे उणे नक्त मुल्य (निगेटिव्ह नेट वर्थ) असलेल्या आणि थकहमीवरील पूर्व हंगामी तसेच अल्प मुदत कर्ज बाकी नसलेल्या आणि गेल्या वर्षीच्या हंगामात एफआरपीप्रमाणे ३० सप्टेंबर २०१५ पर्यंत किमान ९० टक्के ऊस देयके अदा केलेलेच सहकारी साखर कारखाने तसेच सहकारी साखर कारखान्यांनी चालविण्यास घेतलेल्या सहकारी कारखान्यांकरिता २०१५-१६च्या हंगामाकरिता अल्प मुदत कर्ज आणि त्यावरील व्याजास शासन थकहमी देण्यात आली आहे.

साखर कारखान्यांच्या प्रतिदिन गाळप क्षमतेनुसार (टीसीडी) अल्प मुदत कर्जाची मर्यादा राहील. त्यानुसार प्रतिदिन १२५० टनापर्यंत गाळप क्षमतेसाठी ५ कोटी, १२५१ ते २५०० टन गाळपासाठी ७ कोटी, २५०१ ते ३५०० टन गाळपासाठी ९ कोटी, ३५०१ ते ५००० टन गाळपासाठी १२ कोटी आणि ५ हजार टनापेक्षा जास्त गाळप क्षमतेसाठी १५ कोटी रूपये अल्प मुदतीची कर्ज मर्यादा राहणार आहे. हे अल्प मुदतीचे कर्ज मर्यादेपर्यंत आणि त्यावरील व्याज देण्यासाठी राज्य शासनाच्या अटीनुसार थकहमी देण्यात येणार आहे.

राज्यात २०१४-१५ मध्ये म्हणजे गेल्या हंगामात ९९ सहकारी आणि ७९ खासगी असे एकूण १७८ साखर कारखान्यांनी ९३०.४१ लाख मेट्रिक टन उसाचे विक्रमी गाळप केले असून १०५१.४३ लाख क्विंटल साखर उत्पादित केली आहे. या हंगामातील गाळप केलेल्या उसाची एफआरपीप्रमाणे देयके १९ हजार १०४ कोटी रुपयांची आहेत. यापैकी काही कारखान्यांनी १५ सप्टेंबर २०१५ अखेर १६ हजार ६०२ कोटी रुपयांची देयके शेतकऱ्यांना अदा केली आहेत. तर यापैकी २ हजार ५३४ कोटी रुपयांची देयके प्रलंबित आहेत. गेल्या वर्षामध्ये आंतरराष्ट्रीय आणि देशांतील बाजारात साखरेचे दर सातत्याने घटत आहेत. त्यामुळे एफआरपीप्रमाणे ऊस देयके देण्यासाठी वित्तीय संस्थांकडून कारखान्यांना मालतारण खात्यावर पुरेशी उचल उपलब्ध होत नाही. हंगाम २०१५-१६ मधील अनेक साखर कारखान्यांचे निगेटिव्ह नेट वर्थ झालेले असून कारखान्यांना वित्तीय संस्थांकडून कर्ज घेण्यास अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. गाळप हंगाम २०१५-१६ च्या प्राथमिक अंदाजानुसार राज्यात ९.८७ लाख हेक्टर क्षेत्रावर ऊस लागवड झालेली आहे. निव्वळ गाळपासाठी अंदाजे ७६० लाख मेट्रिक टन उसाची उपलब्धता अपेक्षित आहे. यातून ८५.८८ लाख मेट्रिक टन साखर उत्पादन होईल. गाळप हंगाम २०१४-१५ मध्ये कारखान्यांचे खात्यावर शॉर्ट मार्जिन निर्माण झाल्याने या हंगामाच्या पूर्व तयारीसाठी कर्ज मिळविण्यास कारखान्यांना अडचणी येत आहेत.

मागील हंगामातील उसाचे विक्रमी गाळप आणि येत्या हंगामात उपलब्ध होणाऱ्या उसाचे प्रमाण विचारात घेता आगामी हंगाम सुरळीत पार पाडण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली होती. यावर्षीच्या ऊस गाळप हंगामासाठी उपलब्ध ऊस, राज्यातील शिल्लक साखर साठा, साखर कारखान्यांची स्थिती या सर्व बाबी विचारात घेता कारखान्यांनी गाळप क्षमतेचा पूर्ण वापर करण्याच्या दृष्टीने आर्थिक अडचण येऊ नये यासाठी हा निर्णय घेण्यात आला.

सहकारी साखर कारखान्यांना सुमारे १८० कोटी रुपयांचे अल्पमुदत कर्ज मर्यादा व त्यावरील व्याजास थकहमी मिळणार आहे. कारखान्यांचे लेखा परीक्षण सुरू झाल्यानंतर उणे नक्त मूल्य (निगेटिव्ह नेट वर्थ) असलेल्या कारखान्यांच्या संख्येत बदल होण्याची शक्यता आहे. त्यामुळे कारखान्यांची संख्या आणि कर्ज रक्कमेत वाढ होणार आहे.

-----o-----

कृषी/मदत व पुनर्वसन

## राज्यात सरासरीच्या ६२ टक्के पाऊस, ५६ टक्के पाणीसाठा

गेल्या काही दिवसात राज्यात प्रामुख्याने कोकण किनारपट्टी, मध्य महाराष्ट्र या भागात हलक्या स्वरूपाचा पाऊस पडला. आजपर्यंत ७०६.७ मि.मी. पाऊस झाला असून तो ११४४.३ मि.मी. या सरासरीच्या ६१.८ टक्के आहे. राज्यातील सर्व जलप्रकल्पांत ५६ टक्के एवढा साठा आहे.

राज्यात सरासरीच्या तुलनेत प्रत्यक्ष पडलेल्या पावसानुसार जिल्ह्यांची वर्गवारी पुढीलप्रमाणे- धुळे, नंदूरबार, अहमदनगर, पुणे, सांगली, औरंगाबाद, बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, वर्धा, नागपूर, गोंदिया या १३ जिल्ह्यांत ७६ ते १०० टक्के पाऊस झाला आहे. ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर, जळगाव, सोलापूर, सातारा, जालना, बीड, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, हिंगोली, यवतमाळ, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली या १८ जिल्ह्यांमध्ये ५१ ते ७५ टक्के पावसाची नोंद झाली असून नाशिक, कोल्हापूर, परभणी या ३ जिल्ह्यांत २६ ते ५० टक्के पाऊस पडला आहे.

राज्यातील ३५५ तालुक्यांपैकी शून्य तालुक्यात सरासरीच्या तुलनेत ० ते २५ टक्के, ४७ तालुक्यांत २६ ते ५० टक्के, १७७ तालुक्यांत ५१ ते ७५ टक्के, १०७ तालुक्यांत ७६ ते १०० टक्के आणि २४ तालुक्यांत तर १०० टक्क्यांपेक्षा अधिक पाऊस झाला आहे.

### सोयाबीन, मूग, उडीद, बाजरीची काढणी तर कापसाच्या वेचणीस सुरुवात

राज्यातील खरीप पिकाचे सरासरी क्षेत्र १३४ लाख ७० हजार हेक्टर असून १ ऑक्टोबर अखेर १३१ लाख ५९ हजार हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. सरासरी क्षेत्राच्या तुलनेत ९८ टक्के क्षेत्रावर पेरणी झाली आहे.

राज्यात भात पीक निसवणे, दाणे भरणे ते दाणे पक्वतेच्या अवस्थेत आहे. खरीप ज्वारी पीक दाणे भरणे ते दाणे पक्वतेच्या अवस्थेत, बाजरी पीक दाणे भरणे ते दाणे पक्वतेच्या अवस्थेत तर काही ठिकाणी काढणीस सुरुवात झाली आहे. मका पीक वाढीच्या ते फुलोरा अवस्थेत आहे. तूर पीक वाढीच्या अवस्थेत, उडिद व मुग पिके शेंगा पक्वतेच्या अवस्थेत तर काही ठिकाणी काढणी प्रगतीपथावर आहे. सोयाबीन पीक शेंगा धरणे ते पक्वतेच्या अवस्थेत तर काही ठिकाणी काढणीस सुरुवात झाली आहे. कापूस पीक फुले व बोंडे लागण्याच्या अवस्थेत आहे, तर काही ठिकाणी वेचणीस सुरुवात झाली आहे.

### धरणात ५६ टक्के पाणी साठा

राज्यातील सर्व जलप्रकल्पांत ५६ टक्के साठा असून गेल्या वर्षी याच सुमारास ७८ टक्के साठा होता. प्रकल्पातील विभागनिहाय आजचा आणि कंसात गतवर्षी याच दिवशीचा साठा पुढीलप्रमाणे-

मराठवाडा - १५ टक्के (४३), कोकण - ८७ टक्के (९४), नागपूर - ७४ टक्के (७५), अमरावती- ७२ टक्के (७६), नाशिक - ६० टक्के (८५) आणि पुणे - ६० टक्के (९२), इतर धरणे - ७४ टक्के (९०) असा पाणीसाठा आहे.

**राज्यात  टँकर्सच्या संख्येत घट**

राज्यातील ६४५ गावे आणि १४६४ वाड्यांना आजमितीस ८४० टँकर्सद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येत आहे. गेल्या काही दिवसात झालेल्या पावसामुळे टँकर्सची संख्या मोठ्या प्रमाणात घटली आहे. मागील वर्षी याच सुमारास ३८ टँकर्सद्वारे पुरवठा करण्यात येत होता.

**रोहयो कामांवर एक लाख मजुरांची उपस्थिती**

राज्यात महाराष्ट्र राज्य ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामांवर २६ सप्टेंबर अखेर एक लाख तीन हजार ९४५ मजूर उपस्थिती होती. तसेच राज्यात १४ हजार ५२४ कामे सुरू असून चार लाख २३ हजार ६४८ कामे शेल्फवर आहेत. या कामांची मजूर क्षमता १२८८.४४ लाख एवढी आहे.

-----o-----

बातमी

ओसाका विद्यापीठाकडून डॉक्टरेट

# राज्य मंत्रिमंडळातर्फे मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन

मुंबई, दि. ६ : जपानच्या ओसाका सिटी विद्यापीठातर्फे मानद डॉक्टरेट जाहीर करण्यात आल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे राज्य मंत्रिमंडळातर्फे अभिनंदन करण्यात आले. मंत्रिमंडळाचे सचिव तथा राज्याचे मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय यांनी श्री. फडणवीस यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

या विद्यापीठाची मानद डॉक्टरेट मिळविणारे श्री १२० .फडणवीस हे पहिलेच भारतीय आहेत . वर्षांची गौरवशाली परंपरा असणाऱ्या ओसाका सिटी विद्यापीठातर्फे दिली जाणारी ही सर्वोच्च पदवी असून गेल्या वीस वर्षात आतापर्यंत ती फक्त दहा लोकांनाच प्रदान करण्यात आली आहे .या मानद डॉक्टरेटसाठी मानकऱ्यांची निवड करताना नियमित डॉक्टरेटपेक्षा वेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण निकष लावले जातात .राज्याची सुत्रे स्विकारल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी विविध क्षेत्रात कृतिशील उपाययोजना करुन राज्यात आर्थिक-सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया सुरु केल्याबद्दल त्यांची या सन्मानासाठी निवड करण्यात आली आहे.

-----o-----